जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2020
पुढारी

# इंदिरा गांधी यांना अभिवादन

**कोल्हापूर :** भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी हिंदी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी सर्वांना सद्भावना व एकात्मतेची शपथ दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. आर.व्ही. गुरव, अभय जायभाये उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 NOV 2020
लोकमत

# विद्यापीठात इंदिरा गांधी यांना अभिवादन

कोल्हापूर : माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी हिंदी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी सर्वांना सद्भावना व एकात्मतेची शपथ दिली. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

20 NOV 2020 **Times of India** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# This Diwali was noisier than last year, despite curbs

## Study Shows Noise Levels Highest On Laxmi Puja

TIMES NEWS NETWORK



Rahul Gayakwad

The study, conducted by the SUK, shows that except for industrial areas, where all the activities were almost closed, the noise levels in residential, commercial and silent zones of the city were high

**Kolhapur:** The noise levels in various parts of the city were higher than last year during Diwali despite the restrictions on bursting firecrackers in the open, shows a study conducted by the Shivaji University.

Considering the Covid-19 pandemic, the state government and various district collectors had issued directives restricting bursting of firecrackers in public places.

The study shows that except for the industrial areas, where all the activities were almost closed, the noise levels in the residential, commercial and even the silent zones of the city were high in the three days of Diwali.

The noise levels were highest on the day of Laxmi Pujan. The noise level during Diwali was higher compared to Ganeshotsav this year, the study indicates.

A team of Shivaji University's environment science department conducted the study on air pollution and noise levels at 22 different spots from 6pm to 10 pm.

The noise level was recorded in areas including Chhatrapati Pramilaraje Hospital, district collector office, the district court, Shivaji University, Rajarampuri, Shivaji Peth, Nagla Park, Mangalwar Peth and Shahupuri among others.

Industrial areas like Y P Powar Nagar, Udyam Nagar and Shivaji Peth recorded less than permissible decibel (dB) levels.

Whereas, Mahadwar road, where a majority of the shops are located, recorded 63.67 dB during Diwali. Last year, the same spot had reported 60.33 dB last year during Diwali. Rajarampuri, another major commercial area in the city, recorded 60.33 dB while it was 58.52 dB last year.

Laxmipuri registered 59.70 dB as against 58.19 dB last year. Bindu chowk, another congested area, recorded 62.88 dB this year against 61.67 dB last year.

The residential area of Nagla Park recorded 53.92 dB as against 52.96 dB last year. Sound level in Rajarampuri was 55.09 dB, compared to 53.31dB in last Diwali. The sound level near Mirajkar ticketi was 59.35 dB, while it was 58.38 dB last year. The residential area of Nagla Park recorded 53.92 dB as against 52.96 dB last year.

Meanwhile, the Central Pollution Control Board has laid down the permissible noise level in India for different areas. In industrial areas, the permissible limit is 75 dB during the day and 70 dB at night. In commercial areas, it is 65 dB during the day and 55 dB at night while in residential areas it is 55 dB and 45 dB during day and night, respectively.

There is also a category called silent zone, which includes areas that lie within 100m of schools, colleges, hospitals and courts. The permissible noise limit in this zone is 50 dB during the day and 40 dB at night.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 NOV 2020

तरुण भारत

# दिवाळीत फटाक्यांच्या आवाजात किंचित वाढ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे दरवर्षी दीपावलीमध्ये फटाक्यांची ध्वनी (डेसिबल) पातळी मोजली जाते. गतवर्षीपेक्षा यंदा ठराविक कालावधीमध्ये व्यापारी पेठांमध्ये मानांकनापेक्षा डेसिबलमध्ये किंचित वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनलॉककडे जाताना बाजारपेठा गजबजल्या होत्या. बाजारपेठांमधील वाहने, लोकांच्या आवाजाचाही फटाक्यांच्या डेसीबलमध्ये समावेश झाल्याने डेसीबलमध्ये वाढ झाल्याचे मत अभ्यासकांचे आहे.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे तपासणी अहवालानुसार औद्योगिक क्षेत्राबरोबरच रहिवासी क्षेत्रात देखील ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर फटाकेमुक्त दिवाळी करण्याचे आवाहन राष्ट्रीय हरीत लवादाने केले होते. या आवाहनाला सर्वसामान्य जनतेने प्रतिसाद दिला. परंतु लक्ष्मीपूजन आणि पाढव्याच्या दिवशी ठराविक वेळेत बाजारपेठांमध्ये जास्त प्रमाणात फटाके फोडले. आठ महिने बंद असलेल्या बाजारपेठा सुरू झाल्याचा आनंद व्यापाऱ्यांनी फटाके फोडून जणू व्यक्त केला. तसेच खरेदीसाठी आलेल्या लोकांचा आणि गाड्यांच्या आवाजातही मानांकनापेक्षा वाढ झाली आहे. दीपावलीमध्ये रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक व शांत (सायलेंट) क्षेत्रातील फटाक्यांची ध्वनी पातळी मोजली आहे. मानांकनाप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ व रात्री ७० डेसीबल, व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५ व रात्री ५५, रहिवासी क्षेत्रात दिवसा ५५ व रात्री ४५ तसेच शांत (सायलेंट) क्षेत्रात दिवसा ५० व रात्री ४० डेसिबल असावे, असा नियम आहे. यंदा ध्वनी पातळीत गतवर्षीपेक्षा किंचित आवाजाची पातळी वाढली आहे.



- विद्यापीठ पर्यावरणशास्त्र अधिविभागाचा अहवाल
- लोकांच्या आणि गाड्यांच्या आवाजात मानांकनापेक्षा वाढ

**लक्ष्मीपूजन आणि पाडव्याच्या दिवशी घेतलेल्या डेसीबलचे प्रमाण**

| क्षेत्र | क्षेत्राचे नाव | २०१९ ची रात्रीची ध्वनी पातळी (डेसीबल) | २०२० ची रात्रीची ध्वनी पातळी (डेसीबल) |
|---|---|---|---|
| रहिवासी क्षेत्र | राजारामपुरी | ५०.५४ | ५१.१२ |
| | उत्तरेश्वर पेठ | ६१.६५ | ५८.५७ |
| | ताराबाई पार्क | ५४.७८ | ५२.४३ |
| | शिवाजी पेठ | ५५.५६ | ५८.६८ |
| | नागाळा पार्क | ५२.९६ | ५३.९२ |
| | मंगळवार पेठ | ५३.८५ | ५६.७२ |
| व्यावसायिक क्षेत्र | राजारामपुरी | ५८.५२ | ६०.६३ |
| | शाहुपूरी | ५९.०३ | ६६.५३ |
| | लक्ष्मीपुरी | ५८.३१ | ५९.७ |
| | महाव्दार रोड | ६०.३३ | ६३.६७ |
| | गुजरी कॉर्नर | ६६.२७ | ६४.१८ |
| | पापाची तिकटी | ६५.८४ | ६८.७८ |
| | बिनखांबी गणेश मंदिर | ६३.२१ | ६३.४ |
| | मिरजकर तिकटी | ५८.३८ | ५९.३५ |
| | गंगावेश | ६०.४६ | ६०.३८ |
| | बिंदुचौक | ६१.५७ | ६२.८८ |
| शांत(सायलेंट) क्षेत्र | सीपीआर चौक | ५२.७६ | ५४ |
| | कोर्ट | ५०.६३ | ५४.७९ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ५५.३५ | ५६.३७ |
| | शिवाजी विद्यापीठ | ५०.५४ | ५१.१२ |
| औद्योगिक | उद्यमनगर | ५९.६१ | ५९.०४ |
| | वाय. पी. पवार नगर | ५८.१९ | ६०.०५ |

20 NOV 2020

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिवाळीत ध्वनिप्रदूषणात वाढ

## फटाक्यांसह गर्दीचीही पडली भर

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १९ : दिवाळीच्या कालावधीत शहरातील ध्वनिप्रदूषणात गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ झाली. विशेषतः खरेदीसाठी गजबजलेल्या बाजारपेठांत प्रदूषणाचे प्रमाण अधिक आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या ध्वनिमर्यादेपेक्षा हे प्रमाण अधिक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. पर्यावरणशास्त्र अधिविभागाने हे सर्वेक्षण करून अहवाल बनविला आहे.**



गणेशोत्सव आणि दिवाळीत शहरातील विविध भागातील वातावरणातील ध्वनीचे सर्वेक्षण केले जाते. त्यातून त्याकाळात प्रदूषणाची पातळी किती हे निश्चित केले जाते. यंदाच्या दिवाळीमध्ये शनिवार (ता. १४) ते सोमवार (ता. १६) या कालावधीत ध्वनिप्रदूषणाचे नमूने घेतले. यात गेल्या वर्षीच्या दिवाळीच्या तुलनेत यंदा वाढ झाल्याचे दिसले. यामध्ये फटाक्यांचे प्रमाण यंदा कमी असले तरी लॉकडाऊननंतर सुरू झालेल्या बाजारपेठांमधील गर्दी आणि तेथील गोंगाटामुळे बाजारपेठा, व्यावयायिक क्षेत्र यामधील ध्वनी प्रदूषण वाढल्याचे दिसून आले. सर्वच क्षेत्रांमधले ध्वनी प्रदूषण गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढले असून, निश्चित केलेल्या ध्वनी मर्यादेपेक्षा ते अधिक आहे. असे अहवालात म्हटले आहे.

हे सर्वेक्षण पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, विभागप्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चेतन भोसले, अजय गौड यांनी केले आहे.

| झोन | ठिकाण | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|---|
| ध्वनी प्रतिबंधक क्षेत्र | सीपीआर | ६०.९० | ५२.७६ | ५४.०० |
| | न्यायालय | ६२.६० | ५०.६३ | ५४.७९ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ६१.१० | ५५.३५ | ५६.३७ |
| रहिवासी क्षेत्र | राजारामपुरी | ५४.५० | ५३.३१ | ५५.०९ |
| | उत्तरेश्वर पेठ | ६२.८० | ६१.६५ | ५८.५७ |
| | ताराबाई पार्क | ५६.९० | ५४.७८ | ५२.४३ |
| | शिवाजी पेठ | ५८.९० | ५५.५६ | ५८.६८ |
| | नागाळा पार्क | ५५.९० | ५२.१६ | ५३.१२ |
| | मंगळवार पेठ | ५४.७० | ५३.८५ | ५६.७२ |
| व्यावसायिक | राजारामपुरी | ६४.४० | ५८.५२ | ६०.६३ |
| | शाहूपुरी | ६२.३० | ५९.०३ | ६३.५३ |
| | लक्ष्मीपुरी | ६१.९० | ५८.३१ | ५९.७० |
| | महाद्वार रोड | ६३.७० | ६०.३३ | ६३.६७ |
| औद्योगिक | उद्यमनगर | ५८.५० | ५९.६१ | ५९.०४ |
| | वाय. पी. पोवारनगर | ५६.७० | ५८.१९ | ६०.०५ |

20 NOV 2020

**लोकसत्ता**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘फटाकेमुक्त दिवाळी’कडे कोल्हापुरकरांची पाठ

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** करोना साथीमुळे दिवाळी साधेपणाने साजरी करण्याचे आवाहन केले असताना दिवाळीत फटाक्यांचा आवाज कमी होईल अशी अपेक्षा होती. कोल्हापुरात बावीस ठिकाणांचे ध्वनिमापन सर्वेक्षण केले असताना लक्ष्मी पूजनाच्या दिवशी आवाजाच्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे दिसून आले आहे. दिवाळीचा आनंद धडाक्याने साजरा करताना कोल्हापूरकरांच्या आनंदासमोर मागच्या वर्षीचा आवाजही क्षीण झाला असून ‘फटाकेमुक्त दिवाळी’ या प्रशासनाच्या आवाहनाकडे फटाकेप्रेमी नागरिकांनी पाठ फिरवल्याचे दिसून आले आहे.

यंदा करोना कहर वाढीस लागल्यामुळे गणपती, नवरात्र, दहीहंडी, रमजान ईद, बकरी ईद यांसारखे मोठे सण अत्यंत साधेपणाने साजरे केले. गेल्या महिनाभरापासून करोना रुग्ण संख्या घटल्याने भयछाया दूर होत असल्याचे रस्तोरस्ती झालेली गर्दी दर्शवते. दिवाळीची खरेदीसाठी झुंबड उडाल्याचे चित्र प्रत्येक शहर – गावात दिसून आले.

## शहरातील ध्वनिप्रदूषणात वाढ

दिवाळीमध्ये फटाके उडवू नये असे आवाहन करूनही त्याकडे दुर्लक्ष केल्याचे कोल्हापुरातील चित्र आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत व सहकारी विद्यार्थ्यांनी शांतता, निवासी, व्यापारी, औद्योगिक अशा चार घटकांतील बत्तीस ठिकाणी ध्वनिमापन सर्वेक्षण केले. त्यात आढळलेल्या आकडेवारीवर नजर टाकली असता गतवर्षीपेक्षा यंदा अनेक ठिकाणी फटाक्याचा आवाज वाढल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे.

### शहरभर आवाज वाढव

जिल्हा प्रशासनाने फटाकेमुक्त दिवाळी साजरी करा असे आवाहन केले असताना याच कार्यालयाच्या परिसरात गतवर्षी ५५.३५ डेसिबल आवाज असताना यंदा तो ५६.३७ असा वाढला आहे. याशिवाय छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, न्यायालय, शिवाजी विद्यापीठ या अन्य तीन शांतता क्षेत्रातही फटाक्यांचा आवाज वाढला आहे. निवासी भागातही साधारण हेच क्षेत्र आहे. ताराबाई पार्क, शिवाजी पेठ, नागाळा पार्क, मंगळवार पेठ येथे गतवर्षीपेक्षा अधिक आवाज आहे. अपवाद आहे तो उत्तरेश्वर पेठ भागात. या भागात गतवर्षी ६१.६५ डेसिबल आवाज होता, यंदा तो ५८.५७ इतका कमी झाला आहे. ग्राहकांनी दिवाळीची खरेदी जोरात केल्याने व्यापारीवर्ग खुशीत होता हे त्यांनी वाजवलेल्या फटाक्यांनी दाखवून दिले आहे. राजारामपुरी, शाहूपुरी, लक्ष्मीपुरी, महाद्वार रोड येथे आवाज वाढला आहे. .गुजरी, बिनखांबी मंदिर, गंगावेश येथे आवाज किंचित कमी झाला आहे दोन उद्योग भागात आपण सर्वेक्षण केले. त्यापैकी उद्यमनगर येथे गतवर्षी ५९.१ डेसिबल असणारा आवाज यंदा अर्धा टक्के कमी झाला आहे. वाय. पी. पोवार नगर येथे वाढ झाली आहे.

सन २०१८ या वर्षामध्ये दिवाळीतील फटाक्यांच्या आवाजाची क्षमता आणि गतवर्षी महापुरानंतरची आवाजाच्या क्षमतेची तुलना केली असता २०१८ पेक्षा २०१९ मध्ये फटाक्यांचा आवाज कमी होता. न्यायालय परिसरामध्ये २०१८ मध्ये ६२.८ डेसिबल असणारा आवाज गतवर्षी ५०.१ होता तर यंदा तो ५४.९ इतका झाला आहे. निवासी, व्यापारी, औद्योगिक भागातही याहून वेगळे चित्र नाही हे सर्वेक्षण सांगते.

## करोना भयाकडे दुर्लक्ष

दिवाळीवर करोना भीतीचे सावट होते. फटाक्यांच्या आवाजामुळे श्वसनाचे विकार वाढीस लागत असल्याने फटाके वाजवू नयेत. फटाक्यांच्या धुराच्या संपर्कात येऊ नये, असे आवाहन वैद्यकीय विभागाच्यावतीने करण्यात आले होते. मात्र या धोक्याच्या इशाराकडे दिवाळीचा आनंद लुटणाऱ्या कोल्हापूरकरांनी दुर्लक्ष केल्याचे दिसते. करोना, त्यापासून होणारे वैद्यकीय दुष्परिणाम, पर्यावरण, सामाजिक भान याबाबत कोल्हापूरकर कितपत गंभीर आहेत याचा प्रत्यय आवाजाच्या आकडेवारीने दिला आहे.